**The DDG (Horticulture Science), Indian Council of Agriculture Research and the Director, ICAR-National Research Centre for Grapes, Pune attended the *Panchmahabhut Lokotsav* in Kolhapur on 25th February, 2023**

Dr A.K. Singh, DDG (Hort. Science) and Dr Kaushik Banerjee, the Director, ICAR-NRC Grapes participated in the *Panchmahabhut Lokotsav* in Kolhapur, which was organized by Shri Kshetra Sidhhagiri, Kaneri Math. In this event Dr Singh and Dr Banerjee presented the importance of managing *panchmahabhut*, i.e. "Earth, Water, Fire, Air and Space" for implementation of good agricultural practices at farm levels. They also discussed the relevance and challenges of organic and natural farming in the horticulture sector.


६

रविवार, २६ फेब्रुवारी २०२३

सकाळ अॅग्रोवन


# पर्यावरणाची हानी सेंद्रिय शेती करून टाळावी

## कणेरी सुमंगल पंचमहाभूत लोकोत्सव चर्चासत्रातील सूर

**कोल्हापूर :** भविष्यात येणारा काळ हा शेती क्षेत्रासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. आगामी काळात पर्यावरण पूरक शेती करणे हे मोठे आव्हान शेतकऱ्यांपुढे आहे. व्यावसायिक शेती करताना सेंद्रिय शेतीला महत्त्व द्यावे. जेवढ्या जास्त प्रमाणात सेंद्रिय शेती होईल, तेवढ्या अधिक प्रमाणात कसदार अन्न सर्वांना मिळेल, असा सूर कणेरी (ता. करवीर) येथे आयोजित चर्चासत्रात उमटला.

येथील सुमंगल पंचमहाभूत लोकोत्सवामध्ये शनिवारी (ता.२५) 'शेती' या विषयावर चर्चासत्र झाले. त्यात देशभरातील विविध शेती संस्थांच्या पदाधिकारी, शास्त्रज्ञांनी भाग घेतला.

मठाधिपती काडसिद्धेश्वर म्हणाले, "भविष्यामध्ये सेंद्रिय शेतीच जगाला तारेल. येणाऱ्या काळात मातीची सुपीकता कायम ठेवणे प्राधान्याने करणे गरजेचे आहे. यासाठी सेंद्रिय पदार्थ हाच मुख्य घटक असेल. यामुळे शेतकऱ्यांनी जमिनीच्या पोषणाकडे अधिक लक्ष द्यावे."



**कणेरी, जि. कोल्हापूर : सुमंगल पंचमहाभूत लोकोत्सवात शनिवारी (ता.२५) 'शेती' या विषयावरील चर्चासत्राचे उदघाटन खासदार विनय सहस्त्रबुद्धे, मठाधिपती काडसिद्धेश्वर महाराज आदींसह मान्यवरांच्या हस्ते झाले.**

विनय सहस्त्रबुद्धे, भारतीय किसान संघाचे दिनेश कुलकर्णी, भारतीय संशोधन परिषदेचे डॉ. ए. के. सिंह, जगन्नाथ दीक्षित, कौशिक बॅनर्जी यांची भाषणे झाली. शेती पर्यावरण पूरकच व्हावी, यासाठी शेतकऱ्यांनी आतापासूनच प्रयत्न करावेत. शिक्षण संस्थांतून पंचमहाभूत सजगता अभ्यासक्रम सुरू करावेत, यावर चर्चा झाली.